गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक ६४ वा ● गुरुवार २० जुलै २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-
| Volume 1 | Issue 64 | Date : 20/07/2023 | blow : Thursday | Page 4 | Price 4

## विजेच्या धक्क्याने १६ मृत्युमुखी
### 'नमामि गंगे' प्रकल्पात भीषण दुर्घटना

गोपेश्वर / डेहराडून : उत्तराखंडमधील चमोली जिल्ह्यात अलकनंदा नदीच्या काठावर 'नमामि गंगे' प्रकल्पातील विद्युत रोहित्रामुळे (ट्रान्सफॉर्मर) विजेचा धक्का बसल्याने १६ जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये गृहरक्षक दलाचे तीन जवान आणि एका पोलिसाचा समावेश असून सात जण जखमी झाले आहेत. 'नमामि गंगे' शुद्धीकरण प्रकल्पाच्या सांडपाणी प्रक्रिया केंद्रात वीजप्रवाह उतरल्याने ही दुर्घटना घडली.

चमोलीचे पोलीस अधीक्षक प्रमेंद्र डोबाल यांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी रात्री एका व्यक्तीचा विजेच्या धक्क्याने मृत्यू झाला होता. या घटनेचा बुधवारी पंचनामा सुरू होता. सकाळी साडे अकराच्या सुमारास सांडपाणी प्रक्रिया केंद्राच्या संरक्षक कठड्यांमध्ये वीजप्रवाह उतरला. हा धक्का इतका तीव्र होता की अनेकांचा जागीच मृत्यू झाला. मंगळवारी मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तीचे काही नातलगही बुधवारच्या घटनेत दगावले. पोलीस उपनिरीक्षक प्रदीप रावत आणि तीन गृहरक्षक | पान २ वर

## "INDIA' नावाचा अयोग्य वापर
### २६ विरोधी पक्षांविरोधात गुन्हा दाखल

नवी दिल्ली : मंगळवारी (१८ जुलै) बंगळुरू येथे विरोधी पक्षाची बैठक पार पडली. या बैठकीला देशातील प्रमुख २६ विरोधी पक्षाचे नेते उपस्थित होते. या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. दरम्यान, २०२४ च्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या विरोधी पक्षांच्या आघाडीचं नवीन नामकरणही करण्यात आलं. या आघाडीचं नामकरण "INDIA' अर्थात "Indian National Developmental Inclusive -lliance' असं करण्यात आलं आहे. या नामकरणानंतर दुसऱ्याच दिवशी २६ विरोधी पक्षांविरोधात दिल्लीत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मतदारांवर प्रभाव पाडण्यासाठी 'इंडिया' नावाचा अयोग्य वापर केल्याचा आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी २६ विरोधी पक्षांवर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी तक्रारदार अविनीश मिश्रा यांनी केली आहे.

# माळीण-तळीयेची पुनरावृत्ती, खालापूरमध्ये गावावर दरड कोसळली, ३० ते ३५ घरे मलब्याखाली

रायगड : मुंबईसह राज्यभरात पावसाने हाहाकार माजवला आहे. दोन दिवसांपासून रायगड जिल्ह्यामध्ये मुसळधार पावसामुळे नागरिकांची दाणादाण उडाली आहे. बुधवारी रात्री खालापूरजवळील इरसालगड (इरसाल वाडी) येथे दरड कोसळून अनेक कुटुंब मलब्याखाली अडकून मृत्यूमुखी पडल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या गावात ५० ते ६० घरांची वस्ती असून जवळपास २०० ते ३०० मतदार असल्याचे समोर आलेय. प्राथमिक माहितीनुसार मलब्याखाली अंदाजे तीस ते ४० घरातील लोक अडकले आहेत. रायगड जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, जवळपास ६० जणांचा मृत्यू झाल्याची शक्यता आहे. अनेकांना वाचवण्यात यश आलेय. बचावकार्य अद्याप सुरु आहे. नवी मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या मोरबे धरणातील घरांजवळ ही घटना घडली. | पान २ वर



## बचावकार्यासाठी जाताना अग्निशमन दलाच्या जवानाचा दम लागल्यानं मृत्यू

रायगड परिसरातील मोरबे डॅमच्या वरील बाजूस असलेल्या इसालवाडीवर काल रात्री उशिरा दरड कोसळल्याची घटना घडली आहे. बचावासाठी अग्निशमन दल, एनडीआरएफ घटनास्थळी दाखल होत आहेत. दरम्यान, घटनास्थळी जात असतानाच एका अग्निशमन दलाच्या जवानाचा दम लागून मृत्यू झाल्याची माहिती मिळत आहे. दरम्यान, घटनास्थळी पोहोण्यासाठी मुसळधार पाऊस आणि मोठ्या प्रमाणावर असलेलं धुकं बाधा ठरतंय. तसेच पावसामुळे डोंगराचा रस्ता अत्यंत निसरडा झाल्यामुळं बचावकार्यात अडथळा निर्माण होत आहे.


## मुंबई, ठाण्यासह कोकणातील सर्व शाळांना सुट्टी जाहीर

मुंबई : राज्यात येत्या ४८ तासांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली असून त्या पार्श्वभूमीवर मुंबई, ठाणे, पालघर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि रायगडमधील शाळांना गुरूवारी सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हे आदेश दिले आहेत. राज्यातील इतर भागातील परिस्थिती लक्षात घेऊन स्थानिक प्रशासन निर्णय घेणार असल्याचंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. तसेच दहावी आणि बारावीचे उद्या होणारे पुरवणी पेपरही पुढे ढकलण्यात आली आहे.

राज्यातील काही ठिकाणी हवामान खात्याने अतिवृष्टीचा इशारा दिल्याने १०वी व १२वीच्या उद्या होणारी पुरवणी परीक्षा पुढे ढकलण्यात आली आहे. १०वी चे पुढे ढकलण्यात आलेले पेपर २ ऑगस्ट रोजी होतील तर १२ वीचे पेपर ११ ऑगस्ट रोजी होतील. गेल्या दोन दिवसांपासून राज्यातील बहुतांश भागात मुसळधार पाऊस पडत आहे. आज मुंबई, ठाणे, कोकण आणि आजूबाजूच्या परिसरात जोरदार पाऊस झाला. त्यामुळे मंगळवारी या ठिकाणच्या शाळा बंद ठेवण्याचा आदेश मुख्यमंत्र्यांनी दिला आहे. राज्यातील आपत्कालीन परिस्थितीचा पान २ वर

## जगविख्यात मराठमोळा बॉडीबिल्डर आशिष साखरकरचं निधन

मुंबई : जगविख्यात मराठमोळा बॉडीबिल्डर आशिष साखरकर याचं निधन झालं आहे. आशिषनं देश-विदेशात अनेक स्पर्धा जिंकत देशाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला होता. मिस्टर इंडिया, मिस्टर युनिव्हर्स, महाराष्ट्र श्री यांसारखे अनेक खिताब आशिषनं आपल्या नावे केले आहेत. गेल्या काही दिवसांपासून आशिष आजाराशी झुंज देत होता. अखेर या आजारानंच आशिषचं निधन झालं. आशिष साखरकर म्हणजे, बॉडीबिल्डिंग जगतातलं एक मोठं नाव. आशिषच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.



## खतांच्या किंमती मर्यादित राहण्यासाठी केंद्र सरकारकडून एक लाख ३० हजार कोटींची सबसिडी : ना.अजित पवार



मुंबई : केंद्र सरकारने यावर्षी खतांच्या किमती मर्यादित राहाव्यात यासाठी एक लाख ३० हजार कोटी रुपयांची सबसिडी दिली असल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार ंनी दिली. तसेच बोगस खते आणि बियाणे विकणार्यांवर नियंत्रण आणण्याचे काम राज्य सरकार करत असल्याचे अजित पवार म्हणाले. कृषी विभागाच्यावतीनं शेतकऱ्यांना बोगस बियाणे आणि खते विक्री संदर्भात कारवाई सुरु केली असल्याचेही ते म्हणाले.

बियाणांचा १६४ मेट्रीक टन साठा जप्त केला आहे. २२ पोलीस केसेस दाखल करण्यात आल्या आहेत. २० विक्रेत्यांचे परवाने रद्द करण्यात आले आहेत. १०५ विक्रेत्यांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत. खतांसंदर्भात गुणनियंत्रण विभागाने १९० टन साठा जप्त केला असल्याचे अजित पवार म्हणाले. त्यासंदर्भात १३ पोलीस केसेस दाखल करण्यात आल्या आहेत.| पान २ वर

## गोवंश योजना राबवण्यासाठी महाराष्ट्र गोसेवा आयोगाची स्थापना

सोलापूर: राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस याचे आणखी एक ड्रीम प्रोजेक्ट पूर्णत्वास गेलं आहे. राज्यात गाईंची काळजी घेण्यासाठी गोसेवा आयोगाची स्थापना करण्यात आली असून शेखर मुंडदा यांनी त्याच्या अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारली आहेत. राज्य सरकारने नेमलेल्या या आयोगात सहा सदस्य असणार आहेत.

गोवंशाचे महाराष्ट्रात संगोपन, संवर्धन आणि संरक्षण करण्यासाठी गोसेवा आयोगाची स्थापना झाली आहे. त्यामुळे ज्याला आता गाय नाईलाजाने विकावी लागत असेल त्यांनी संपर्क साधावा, आयोग ती गाय विकत घेऊन गोशाळेत पाठवेल असे आवाहन गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा यांनी केले आहे. गोपालक आणि गोरक्षकांच्या पाठीमागे आता महाराष्ट्र गोरक्षक आयोग उभा राहिल असेही मुंदडा यांनी सांगितले. आज आयोगाचे अध्यक्षपद स्वीकारल्यानंतर मुंदडा यांनी विठुरायाचे दर्शन घेऊन कामाला सुरुवात केली.



देशी गायीचे संगोपन हाही यामागचा प्रमुख उद्देश असून गायीपासून मिळणारे शेण, गोमूत्र, दूध याला फार मोठी मागणी आहे. याबाबत जनजागृतीचे काम देखील आयोग करणार आहे. राज्यात सध्या पाच ते सहा लाख गायी असल्याची माहिती असून राज्यातील सर्व गोशाळांची नोंदणी आणि गायीच्या टॅगिंग कामाला देखील सुरुवात होणार असल्याचे मुंदडा यांनी सांगितले. गायीचे जीव वाचवताना जीव गमावलेल्या गोरक्षकांना देखील मदत करण्याची आयोगाची भूमिका असून सर्व गोरक्षकांचा विमा उतरविण्याचा | पान २ वर

## पोलीस उपनिरीक्षक परीक्षेचा निकाल जाहीर

मुंबई: महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दिनांक ११ सप्टेंबर २०२२ (पेपर क्रमांक १) व दिनांक २५ सप्टेंबर २०२२ (पेपर क्रमांक २) रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट ब मुख्य परीक्षा २०२० मधील पोलीस उपनिरीक्षक संवर्गाच्या एकूण ६५० पदांपैकी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (एथड) या प्रवर्गाच्या ६५ पदांचा निकाल उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राखीव ठेवून उर्वरित ५८३ पदांचा अंतिम निकाल आज जाहीर करण्यात आला आहे.

परीक्षेच्या जाहिरातीत अनाथ प्रवर्गासाठी ०६ पदे राखीव होती. तथापि, अंतिम निकालात | पान २ वर

# भर पावसात निघाला भांडीकुंडी सह लाँग मार्च आंबेडकरी समाजाने बायका मुलांसह सोडले गाव

सोलापूर/महेश गायकवाडः डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाची गावात असलेली स्वागत कमान पाडल्याचा निषेध करण्यासाठी बेडग गावातील सारा समाज एक होऊन प्रशासनाकडे न्याय मागितला परंतु कुणीही दखल घेण्यासाठी पुढे सरसावले नाहीत,यामुळे कंटाळून साऱ्या आंबेडकरी समाजाने आपल्या बायका पोरांसह अआणि संसारिक भांडी कुंडी सह मुंबई च्या मंत्रालयावर भर पावसात लाँग मार्च काढत स्वागत कमान पाडल्याच निषेध नोंदविण्यासाठी बेडग गाव सोडून निघाले आहेत, आंबेडकरी समाजाला डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावामुळे गाव सोडण्याची ही दुर्दैवी वेळ गावातील ग्रामस्थांनी आणली आहे ही घटना म्हणजे २३ व्या शतकातील सर्वात मोठा जातीयवाद सिद्ध झाला आहे यासंबधी चे वृत्त असे की, मिरज तालुक्यातील बेडग या गावातील आंबेडकरी समाजातील सुमारे दीडशे कुटुंबातील लोकांनी गाव सोडून भर पावसात मुंबई कडे रवाना झाले भर पावसात निळ्या झेंड्या सह आणि कडेवर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा घेऊन महिला मोठ्या प्रमाणावर या लाँग मार्च सहभागी झाल्या आहेत. गावातील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाची कमान पाडणाऱ्या वर कारवाई करण्यात यावी या मागणी साठी समाजाने हा लाँग मार्च काढला आहे.

बेडग गावात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाची स्वागत कमान भाजपा ची सत्ता असलेल्या ग्रामपंचायत ने एक महिण्यापुर्वी जेसीबी लावुन पाडून टाकली आहे,यामुळे ग्रामपंचायत विरुद्ध आंबेडकरी समाज असा संघर्ष सद्या निर्माण झाला आहे. ग्रामपंचायत ने स्वागत कमान उभारण्यासाठी परवानगी दिली होती, मात्र ही परवानगी बेकायदा असल्याचे सांगून १६ जुन २३ रोजी ग्रामपंचायत ने पाडून टाकली यानंतर संपूर्ण जिल्हाभर आंबेडकरी समाजाने याचा तीव्र निषेध केला गावातील कमान पाडल्या नंतर गावातील वातावरण तंग बनले आहे, गावातील सर्व आंबेडकरी बांधवांनी मिरज येथे गेल्या आठवड्यात बैठक घेतली यामध्ये मंत्रालयावर लाँग मार्च काढण्याचा निर्णय घेण्यात आला. यानंतर संतप्त झालेल्या समाजातील आया बहिणी बायका मुले सगळ्यांनी गाव सोडण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला, त्यानुसार मंगळवारी सकाळीच गावातील सर्व वृद्ध लहान थोर आणि मुले बाळे आपल्या घरातील सर्व भांडी कुंडी सोबत घेऊन आणि कडेवर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा घेऊन निघाले आहेत, काही वाहनांमध्ये महिला लहान मुले



**पहिला मुक्काम मिरज येथे मंगळवारी दुपारी३ वाजता आंदोलक मिरज येथे पोहचले,आणि त्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या समोर ठिया मांडला, मोठा जमाव जमल्यामुळे पोलीसाना येथील वाहतुक अन्य मार्गाने डायव्हर्ट करावी लागली, पहिला मुक्काम मिरज येथे करण्याचे ठरले त्यानुसार त्यांच्या राहण्याची आणि जेवणाची व्यवस्था स्थानिक आंबेडकरी जनतेनी केली होती.**

तसेच वृद्ध आंदोलक यांच्या सह त्यांच्या सामानाची व्यवस्था करण्यात आली आहे. ठोस निर्णय झाल्या शिवाय गावात जायचे नाही, या एकमेव भूमिकेतून आंदोलक मुंबई कडे रवाना झाले आहेत

### पालकमंत्री आणि खासदारांचा प्रशासनावर प्रचंड दबाव

ग्रामपंचायत मध्ये भाजपाची सत्ता आहे त्यामुळे पालकमंत्री सुरेश भाऊ खाडे व खासदार संजय पाटीलहे१ प्रशासनावर दबाव आणला असल्याचा आरोप आंदोलकांचे नेते डॉ महेश कुमार कांबळे यांनी प्रस्तुत प्रतिनिधी शी बोलतांना केला, बेमुदत उपोषण सुरू केल्यावर जनसुराज्य पक्ष वगळता कोणत्याही पक्षाच्या नेत्यांनी आंदोलकांना भेटून पाठींबा देण्याची तसदी घेतली नाहीत,

**-महेशकुमार कांबळे,आंदोलकांचे नेते**

**डॉ बाबासाहेब आंबेडकर हे आमचा जीव की प्राण आहेत डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिवाय आमचे जगणे व्यर्थ आहे कोण जर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाला विरोध करत असेल तर त्याची दंडेल शाही आणि मुजोरी आम्ही मोडून काढल्या शिवाय राहणार नाही परंतु बेडग गावातील समाजाने घेतलेल्या निर्णायला आमचा संपूर्ण पाठींबा असून या आंदोलनात आम्ही समाज बांधव म्हणुन सर्वतोपरी सहकार्य करणार आहे, कमान पाडणाऱ्या ग्रामपंचायत च्या सर्व पदाधिका-यावर अट्रोसिटी ऍक्ट प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात यावेत आणि त्यांना तात्काळ अटक करण्यात यावी अन्यथा बेडग गावचे आंदोलन संपुर्ण देशात उभे करू असा इशारा सोलापूर येथील रावण साम्राज्य सामाजिक संस्थेचे महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष आणि राष्ट्रवादी युवक काँग्रेसचेसरचिटणीस युवा उद्योजक सुयश गायकवाड यांनी दिला आहे.**

## अंथरुण पांघरूण व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो सोबत घेऊन पायपीट

कमान पाडणाऱ्या ग्रामपंचायत सदस्यांवर कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी प्रांताधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले, परंतु जिल्हा प्रशासन आरोपींना वाचविण्यासाठी दखल न घेता त्यांना पाठीशी घालत आहे. असे आंदोलन म्हणत आहेत,

प्रशासन तोडगा काढण्यासाठी प्रयत्न करत आहे परंतु तोडगा निघत नाही कारण ग्रामपंचायत सदस्य मागे सरकायला तयार नाहीत, काल दुपारी पोलीस बंदोबस्तात आंदोलक मुले बाळे कपडा लत्ता धान्य भांडीकुंडी अंथरुण पांघरूण तसेच संसारपयोगी साहित्य सोबत घेऊन गाव सोडले आहेत भर पावसात दुपारी ३ वाजता सर्व आंदोलक मिरज येथे पोहचले, निळे ध्वज फडकत आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा कडेवर घेऊन महिला मोठ्या संख्येने मिरज येथे विश्रांती साठी उतरल्या

## ✻ सुविचार ✻

छटाकभर प्रेम शेरभर ज्ञानापेक्षा वरचढ असते.- जॉन वेरली

## संपादकीय

## जनतेला दिलासा मिळेल..

सततचा बदल, कधी प्रचंड उकाडा तर कधी अवकाळी आणि मोठ्या प्रमाणात पाऊस अशा वातावरणाचा फार विपरीत परिणाम उत्पादनांवर होत आहे. त्याचा फटका जेवणात महत्त्वाचा असणाऱ्या टोमॅटो पिकाला बसला आहे. त्यामुळेच स्वयंपाकात अनेक पदार्थांमध्ये सर्रास वापरल्या जाणाऱ्या टोमॅटोचे दर प्रचंड वाढत आहेत. उत्तर भारतात तर पावसाने हाहाकार माजवला आहे. याठिकाणी पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे टोमॅटोच्या दरांबरोबरच सर्व फळ-भाज्यांच्या, डाळींच्या दरात मोठी वाढ झाली आहे. या महागाईमुळे सामान्य जनता मेटाकुटीला आलेली असतानाच जनतेला दिलासा देण्यासाठी केंद्रातील मोदी सरकार पुढे सरसावले आहे. टोमॅटोचे भाव आटोक्यात आणण्यासाठी केंद्र सरकारने तातडीने एक मास्टरप्लॅन तयार केला आहे. महाराष्ट्रासह देशभर टोमॅटोचे भाव वाढलेले आहेत. टोमॅटोचा दर किरकोळ बाजारात काही ठिकाणी २०० रुपयांवर गेला आहे. टोमॅटोच्या भाववाढीमुळे जेरीस आलेल्या नागरिकांना दिलासा देण्यासाठी केंद्र सरकारने दिल्लीसह पाटणा, कानपूर व कोलकाता येथील किरकोळ बाजारात किफायतशीर दरात विक्री करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे लवकरच टोमॅटोच्या किमती खाली येण्याची शक्यता आहे. त्यासाठी केंद्र सरकारने राष्ट्रीय कृषी सहकारी विपणन महासंघ म्हणजेच 'नाफेड' आणि राष्ट्रीय सहकारी ग्राहक संस्थेची मदत घेतली आहे. या संस्थांच्या माध्यमातून आधी दिल्ली-एनसीआर परिसरात ग्राहक विक्री केंद्रांच्या माध्यमातून जनतेला दिलासा देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. नंतर हा प्रयोग देशभर लागू करण्याची योजना आहे. या योजनेचा जनतेला फायदा होईल हे निश्चित. यंदा उन्हाळ्यात झालेल्या अवकाळीमुळे टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. मार्च, एप्रिल महिन्यातील अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांना टोमॅटो काढून बांधावर फेकून द्यावा लागला होता. आता चित्र बदलले असले तरी फारच थोड्या शेतकऱ्यांकडे टोमॅटो आहेत. टोमॅटोला महागाईच्या झोक्यातून उतरविण्याचा आणि टोमॅटोची 'लाली' उतरविण्याचा मास्टर प्लॅन मोदी सरकारने तयार केला आहे. त्यामुळे जनतेला दिलासा मिळणार आहे.

पान १ वरुन

## माळीण-तळीयेची पुनरावृत्ती..

इरसालवाडीमध्ये माळीण आणि तळीयेची पुनरावृत्ती झाली आहे. रायगडमधील तळीये आणि माळीण गावावर दरड कोसळून अनेकांचा मृत्यू झाला होता. तळीये गावातील ३५ घरांवर दरड कोसळली होती, यामध्ये ४४ जणांचा मृत्यू झाला होता. तर माळीणमध्ये १५१ जणांनी आपले प्राण गमावले होते. सकाळी माळीण गावावर डोंगर कोसळला, दरड कोसळली आणि मातीच्या ढिगाऱ्याखाली मूळ माळीण गावातील ७४ पैकी ४४ घरे दबली गेली. जवळजवळ संपूर्ण गाव क्षणार्धात गायब! यामध्ये १५१ जणांचा प्राण गेला होता. याच दुर्घटनेची पुनरावृत्ती पुन्हा एकदा झाली आहे. इरशाळगडमधील तीस पेक्षा जास्त घरावर दरड कोसळली आहे. मलब्याखाली आणखी ४० ते ४५ मृतदेह अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे. मात्र पावसामुळे मदत कार्यास अडथळा निर्माण होत आहे. एनडीआरएफ आणि स्थानिक नागरिकांच्या मदतीने या ठिकाणी बचाव कार्य सुरू करण्यात आलं आहे.इरशाळगड गावावर दरड कोसळल्याची माहिती मिळताच मंत्री उदय सामंत, गिरीश महाजन, दादा भुसे आणि महेश बालदी यांनी तात्काळ घटनास्थळाकडे धाव घेतली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही तात्काळ इरशाळगड येथील दुर्देवी घटनेचा आढावा घेतला. त्यांनी रायगडच्या जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क साधला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज घटनास्थळाला जाण्याची शक्यता आहे.

दुर्देवी घटनेची माहिती मिळताच एनडीआरएफच्या दोन तुकड्या घटनास्थळी पोहचल्या आहेत. त्याशिवाय पोलिसही घटनास्थळावर पोहचले आहेत. अंधार आणि संततधार पावसामुळे बचावकार्यात अडथळा होत आहे. त्यामुळे बचावकार्य थांबवण्यात आले असून सकाळी पुन्हा सुरु करण्यात येणार आहे. पावसामुळे अजूनही डोंगरावरची माती घसरतेय .. गावापर्यंत पोहोचण्याचा रस्ता बंद असून वाहने जात नाहीत, अर्धा तास चालत जावं लागत आहे

## मुंबई, ठाण्यासह कोकणातील

आढावा घेऊन शाळांना सुट्टी जाहीर करण्याबाबत निर्णय घ्यावा असे निर्देश मुंबई शिक्षण उपसंचालकांनी शिक्षण अधिकाऱ्यांना दिले आहेत. आपल्या कार्यक्षेत्रातील स्थानिक परिस्थितीचा आढावा घेऊन शाळांना सुट्टी जाहीर करण्याचे अधिकार संबंधित जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत.

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर आपल्या कार्यकक्षेतील परिस्थिती विचारात घेता आपत्तीच्या पूर्वसूचनेवरून, हवामान खात्याच्या अंदाजावरून तसेच त्या त्या भागातील पावसाच्या सद्यस्थितीचा तसेच त्या अनुषंगाने स्थानिक परिस्थितीचा आढावा घेऊन आपल्या स्थानिक क्षेत्रातील शाळांना सक्षम प्राधिकरण यांच्या मान्यतेने सुट्टी जाहीर करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी, अशा सूचना शिक्षण उपसंचालकांनी दिले आहेत.

पालघर जिल्ह्यासाठी मंगळवारपासून दोन दिवसांसाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. हवामान खात्याच्या त्या अंदाजानुसार रात्रीपासूनच पावसानं पालघर जिल्ह्यात जोर पकडला. त्यामुळं प्रशासनाकडून पालघर जिल्ह्यातल्या नागरिकांना खबरदारी घेण्याचं आवाहन करण्यात आलं. त्याचवेळी पालघर जिल्ह्यासाठी एनडीआरएफ जवानांची एक तुकडी खबरदारीची उपाययोजना म्हणून विरारमध्ये तैनात करण्यात आली. मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर नायगाव, ससूनवघर आणि घोडबंदर भागात पाणी साचल्यानं वाहतूक कोंडी निर्माण झाली. केळवे रोड स्थानर परिसरात पुराचं पाणी साचून रेल्वे वाहतुकीवरही परिणाम झाला. या परिस्थितीचं गांभीर्य लक्षात घेऊन जिल्हा प्रशासनाकडून शाळा आणि महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली. दरम्यान, राज्यात मुसळधार पाऊस होत असून कुठल्याही प्रकारे अनुचित प्रकार होऊ नये म्हणून सर्व यंत्रणांना सज्ज राहण्याचे निर्देश दिले असल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे. नागरिकांनी देखील आवश्यक त्या कामाशिवाय बाहेर पडू नये आणि सुरक्षित स्थळी राहावे असे आवाहन त्यांनी केले आहे.

## खतांच्या किंमती मर्यादित..

५२ विक्रेत्यांचे परवाने रद्द करण्यात आले आहेत. २१० विक्रेत्यांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत. याशिवाय मागील कॅबिनेटमध्ये मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत कृषीमंत्री, महसूलमंत्री, ग्रामविकासमंत्री, पाणीपुरवठामंत्री अशी एक समिती करण्यात आली असल्याचे अजित पवार म्हणाले.

कारवाईचे मागील कायदे लक्षात घेता बोगस खते आणि बियाणे विक्री करणार्यांवर कठोरात कठोर कारवाई केली जात नव्हती. त्यासाठी ही समिती करण्यात आली आहे असे सांगतानाच कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी सांगितल्याप्रमाणे अधिवेशन संपायच्या आत कडक कायदा आणला जाईल असे पवार म्हणाले. बोगस खते आणि बियाणे विकणार्यांवर नियंत्रण आणण्याचे काम राज्य सरकार करत असल्याचा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला. खते आणि बोगस बियाणांच्या मुद्यांवरुन सभागृहात विरोधकांनी आक्रमक पवित्रा घेतला. या मुद्यावरुन विरोधकांनी सभात्याग केला. बोगस बीयाणांच्या संदर्भात किती जणांवर कारवाई केली याची माहिती देण्यात यावी अशी मागणी कॉंग्रेस नेते अशोक चव्हाण यांनी केली होती. तसेच खतांच्या वाढत्या किंमतीच्या मुद्यावरुन देखील विरोधकांनी सरकारला धारेवर धरलं.

## अनुसूचित जमातीच्या गुणवंत विद्यार्थ्यांसाठी प्रोत्साहनपर बक्षिस योजना




राज्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा व त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळून गुणवत्तेबाबत विद्यार्थ्यांमध्ये आवड निर्माण व्हावी. यासाठी राज्यातील इयत्ता दहावी व बारावी मधील शालांत व उच्च माध्यमिक शालांत परिक्षेत विशेष गुणांसह प्राविण्य मिळविणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर बक्षिस योजना सन २०२२-२०२३ सुरु करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.

अशी आहे योजना

आदिवासी विकास विभागांतर्गत राज्यात कार्यरत असलेल्या शासकीय आश्रमशाळा, अनुदानित आश्रमशाळा, नामांकीत शाळा, सैनिक शाळा, एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कुलमधील इयत्ता दहावी व बारावीमध्ये शिक्षण घेत असलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळात तसेच केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळातून गुणवत्ता यादीत प्राविण्यासह गुण मिळूवन राज्यात प्रथम येणाऱ्या ५ मुले व ५ मुली तसेच राज्यातील ९ विभागीय शिक्षण मंडळामध्ये प्रत्येक शिक्षण मंडळात प्रथम येणाऱ्या ३ मुले व ३ मुलींना प्रोत्साहनपर बक्षित योजनेचा लाभ मिळणार आहे.

शासकीय आश्रमशाळा, अनुदानित आश्रमशाळा, सैनिकी शाळा, नामांकीत शाळा, एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कूलमध्ये शिकत असलेल्या इयत्ता दहावी व बारावींच्या परिक्षेत राज्यस्तरावर प्राविण्य मिळविणारे, इयत्ता दहावीतील ५ मुले व ५ मुली, बारावीतील कला शाखेतील ५ मुले व ५ मुली, वाणिज्य शाखेतील ५ मुले व ५ मुली तसेच विज्ञान शाखेतील ५ मुले व ५ मुली साठी प्रथम ३० हजार, द्वितीय २५ हजार, तृतीय २० हजार, चतुर्थ १५ हजार तसेच पाचवा १० हजार प्रोत्साहनपर बक्षिस देण्यात येईल.

तसेच राज्यातील ९ विभागीय मंडळातून महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ येथून प्राविण्य मिळविणाऱ्या एका विभागीय मंडळातील इयत्ता दहावीतील ३ मुले, ३ मुली, बारावीतील कला शाखेतील ३ मुले, ३ मुली, वाणिज्य शाखेतील ३ मुले, ३ मुली तर विज्ञान शाखेतील ३ मुले व ३ मुली अशा २४ विद्यार्थ्यांच्या गटासाठी प्रथम २५ हजार, द्वितीय १५ हजार तर तृतीय १० हजाराचे बक्षिस देण्यात येईल. एकापेक्षा जास्त विद्यार्थ्यांना समान गुण असतील तर सर्वांना त्या क्रमांकाच्या बक्षिसाची रक्कम देण्यात येईल. यासाठी राज्य शासनाने १ कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

**संदिप गावित, उपसंपादक, जिल्हा माहिती कार्यालय,धुळे**

## जपानी महिकांच्या चिरतरुण त्वचेचे रहस्य- राईस फेस क्रीम

सुंदर, नितळ, सुरकुत्या विरहित त्वचा जपानी महिलांच्या सौंदर्याची खासियत आहे. या महिलांची त्वचा पाहून त्यांच्या वयाचा अंदाज मोठ्या मुश्कीलीनेच लावता येतो. जपानी महिला स्वत:च्या त्वचेची निगा राखण्याच्या बाबतीत अतिशय जागरूक समजल्या जातात. त्यांचा अतिशय पौष्टिक, दैनंदिन आहार आणि त्या वापरत असलेली नैसर्गिक प्रसाधने देखील या दृष्टीने पूरक आहेत. प्रसाधनांच्या बाबतीत बोलायचे झाले तर जपानमध्ये घरच्याघरी तयार करण्यात येणारे 'राईस फेस क्रीम' हे प्रसाधन अतिशय लोकप्रिय असून, अधिकाधिक महिला याचा वापर करताना आढळतात. हे क्रीम घरच्या घरी अतिशय सहज तयार करता येत असून, यासाठी आवश्यक साहित्य देखील अगदी सहज उपलब्ध होणारे आहे.

हे क्रीम तयार करण्यासाठी दोन मोठे चमचे तांदूळ, एक लहान चमचा ग्लिसरीन, पाव चमचा ॲलो व्हेरा जेल, आणि तीन इ जीवनसत्वाच्या कॅप्स्युल्सची आवश्यकता आहे. हे क्रीम तयार करण्यासाठी दोन मोठे चमचे तांदूळ दोन ते तीन वेळा पाण्यामध्ये स्वच्छ धुवून घ्यावे. तांदुळात कोणत्याही प्रकारचा कचरा रहाणार नाही, आणि त्यातील पाणी शुभ्र राहीपर्यंत हे तांदूळ परत परत पाण्यामधून धुवून घ्यायचे आहेत. त्यानंतर स्वच्छ पाण्यामध्ये हे तांदूळ रात्रभर पाण्यामध्ये भिजवून ठेवावेत.दुसऱ्या दिवशी हे तांदूळ मऊ शिजवून घ्यावेत आणि हा भात थोडा थंड झाल्यांनतर चांगला कुस्करून घ्यावा. कुस्करलेला हा भात एकदा चाळणीतूनही गाळून घ्यावा, जेणेकरून भाताची शिते यामध्ये शिल्लक राहणार नाहीत. त्यानंतर भाताची ही पेस्ट एका बरणीमध्ये भरून घेऊन यामध्ये एक चमचा ग्लिसरीन, पाव चमचा ॲलो व्हेरा जेल आणि इ जीवनसत्वाच्या तीन कॅप्सूल्स यामध्ये घालून हे मिश्रण व्यवस्थित एकत्र करून घ्यावे. हे राईस क्रीम फ्रीजमध्ये ठेवावे. हे क्रीम फ्रीजमध्ये ठेवल्याने सहा ते सात दिवस चांगले रहाते. दररोज रात्री झोपण्यापूर्वी चेहरा स्वच्छ धुतल्यानंतर हे क्रीम चेहऱ्यावर लावावे. या पेस्टमध्ये तांदुळाच्या ऐवजी तांदुळाच्या पिठाचा वापरही करता येऊ शकेल.

## जाणून घ्या काय असते X, Y, Z आणि Z+ दर्जाची सुरक्षा





केंद्रीय गृह मंत्रालयाने नेत्यांना देण्यात येणाऱ्या सुरक्षेची समीक्षा केली असून, काही नेत्यांची सुरक्षा कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामध्ये आरजेडी प्रमुख लालूप्रसाद यादव, बिहारमधील खासदार राजीव प्रताप रूडी यांची सुरक्षा काढण्यात आली आहे. तसेच, बिहारमधील लोक जनशक्ती पार्टीचे खासदार चिराग पासवान यांच्या सुरक्षेत असलेल्या सीआरपीएफ जवानांना परत बोलवण्यात आले आहे.

त्यांच्या सुरक्षा श्रेणीमध्ये बदल करण्यात आला असून, त्यांना वाय दर्जाची सुरक्षा आता देण्यात येणार आहे. त्याचबरोबर, बहुजन समाज पार्टीचे राज्यसभा राज्यसभा खासदार सतीश चंद्र मिश्र यांचे नाव केंद्रीय सुरक्षा यादीतून काढण्यात आले असून, त्यांना केवळ उत्तर प्रदेशमध्ये झेड दर्जाची सुरक्षा देण्यात येणार आहे. याआधी त्यांना दिल्ली आणि उत्तरप्रदेशमध्ये सुरक्षा देण्यात येत होती. काय असतो सुरक्षा दर्जा ते जाणून घेऊया.भारतामध्ये सुरक्षेचा दर्जा हा धोक्याच्या स्तराबरोबर प्रतिष्ठेची गोष्ट देखील समजली जाते. आयबीच्या शिफारसीनंतर प्रत्येक वर्षी विशिष्ट लोकांच्या सुरक्षेची समीक्षा केली जाते. त्यानंतर धोक्याचा स्तर बघून विशिष्ट दर्जाची सुरक्षा प्रदान करण्यात येत असते.

**एसपीजी सुरक्षा ह्न**

भारतामध्ये पंतप्रधान, उपपंतप्रधान आणि गांधी कुटूंबला एसपीजी सुरक्षा प्राप्त आहे. हा सुरक्षेचा सर्वात उच्च दर्जा आहे. यामध्ये असलेल्या कमोंडोकडे अत्याधुनिक हत्यार आणि संचार उपकरण असतात.

**झेड प्लस सुरक्षा ह्न**स्पेशल प्रोटेक्शन ग्रुपच्या सुरक्षेनंतर झेड प्लस भारतातील उच्च सुरक्षेचा दर्जा आहे. या श्रेणीमधील व्यक्तीच्या सुरक्षेसाठी ३६ जवान तैनात असतात. ज्यामध्ये १० पेक्षा अधिक एनएसजी कमांडोबरोबरच दिल्ली पोलिस, आयटीबीपी अथवा सीआरपीएफचे जवान आणि राज्यातील पोलिस कर्मचाऱ्यांचा समावेश असतो. सुरक्षेसाठी तैनात असणाऱ्या एनएसजी जवानांकडे एमपी ५ मशीनगन असते. त्याचबरोबर त्यांच्या ताफ्यात एक जॅमर असलेली गाडी देखील असते. जे मोबाईल सिग्नल जाम करण्याचे काम करते. देशात मोजक्याच लोकांना झेड प्लस सुरक्षा देण्यात येत असते.

**झेड सुरक्षा ह्न**झेड दर्जाच्या सुरक्षेमध्ये चार ते पाच एनएसजी जवानांबरोबरच एकूण २२ सुरक्षागार्ड असतात. यामध्ये दिल्ली पोलिस, आयटीबीपी अथवा सीआरपीएफचे जवान आणि स्थानिक पोलिसांचा समावेश असतो.

**वाय दर्जाची सुरक्षा ह्न**हा सुरक्षेचा तिसरा स्तर आहे. कमी धोका असणाऱ्या लोकांना ही सुरक्षा दिली जाते. यामध्ये एकूण ११ सुरक्षा जवान असतात. त्यामध्ये दोन पीएसओ (खाजगी सुरक्षारक्षक) देखील असतात. यामध्ये कोणत्याही जवानाचा समावेश नसतो. भारतामध्ये सर्वात अधिक वाय दर्जाची सुरक्षा प्रदान करण्यात येत असते.

**एक्स दर्जाची सुरक्षा ह्न**

या दर्जाच्या सुरक्षेत दोन सुरक्षागार्ड असतात. ज्यामध्ये एक पीएसओ असतो. भारतामध्ये अनेक लोकांना एक्स दर्जाची सुरक्षा देण्यात आलेली आहे.

## विजेच्या धक्क्याने १६ मृत्युमुखी

दल कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. वीजप्रवाह कठड्यांमध्ये उतरण्याचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. राज्याचे पोलिस प्रवक्ते आणि अतिरिक्त पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था) व्ही. मुरुगेशन यांनी मंगळवारी एक तर बुधवारी १५ जणांच्या मृत्यूच्या वृत्तास दुजोरा दिला आणि तपास सुरू असल्याचे सांगितले. जखमींना जिल्हा रुग्णालयात दाखल केले असून, काही जणांना हेलिकॉप्टरद्वारे ऋषिकेशच्या अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेत (एम्स) हलवण्यात आले आहे. मुख्यमंत्री पुष्करसिंग धामी यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला असून, मृतांच्या नातलगांना प्रत्येकी पाच लाख रुपये आणि जखमींना प्रत्येकी एक लाख रुपयांची मदत धामी यांनी जाहीर केली. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनीही मुख्यमंत्र्यांकडून दूरध्वनी करून या दुर्घटनेची माहिती घेतली. उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी यांनी 'नमामी गंगे' प्रकल्पातील दुर्घटनेच्या दंडाधिकारीस्तरीय चौकशीचे आदेश दिले आहेत. दुर्घटनेत दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला. मुख्यमंत्र्यांच्या आदेशानंतर चमोलीचे जिल्हाधिकारी हिमांशू खुराणा यांनी अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी डॉ. अभिषेक त्रिपाठी यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करून, त्यांना एका आठवड्यात सविस्तर तपास अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. अपघाताची कारणे आणि भविष्यात असे अपघात टाळण्यासाठी उपाययोजना व सूचनांचा समावेश अहवालात करण्यास सांगितले आहे.

## गोवंश योजना राबवण्यासाठी महाराष्ट्र

संकल्प आज मुंदडा यांनी केला आहे.

आता गोसंवर्धनासाठी आर्थिक मदत करणाऱ्या मोठ्या कंपन्यांना १२ - आणि ८० ऋ मधून सवलत दिली असल्याने अशा कंपन्यांनी आपल्या उडठ फंडातून मदत करण्याचे आवाहन देखील मुंदडा यांनी केले. महाराष्ट्र गोसेवा आयोगाकडे गोवर्धन गोवंश योजना दिली गेली असून यातून राज्यातील गोशाळांना आर्थिक मदत दिली जाणार आहे. गायीच्या गोठ्यात पत्राशेड, चार आणि दैनंदिन खर्चासाठी जवळपास ७० कोटींची रक्कम दिली जाणार आहे. यात ५० गायी असणाऱ्या गोशाळांना पाच लाख, १०० गायीच्या गोशाळेला १० लाख आणि २०० गायीच्या गोशाळेला १५ लाखांचे अनुदान देण्यात येणार असल्याचे मुंदडा यांनी सांगितले. कोणताही शेतकरी आर्थिक परिस्थिती खालावल्यानंतरच आपल्या जवळची गाय विकत असतो आणि मग ती कसायाकडे जाते आणि त्यानंतर अनेक प्रश्न तयार होतात. हे टाळण्यासाठी गोसेवा अयोग एक टोल फ्री नंबर देणार असून ज्या शेतकऱ्याला आपल्या परिस्थितीमुळे गाय विकण्याची वेळ येईल त्यांनी आयोगाकडे संपर्क साधल्यास अयोग ती गाय विकत घेऊन गोशाळेत देण्याचा प्रयत्न करणार असल्याचेही शेखर मुंदडा यांनी सांगितले.

## पोलीस उपनिरीक्षक

केवळ ०४ उमेदवार अर्हताप्राप्त ठरले असल्यामुळे अनाथ प्रवर्गाची ०२ पदे रिक्त ठेवण्यात आली आहेत.या परीक्षेच्या जाहीर केलेल्या निकालानुसार वाशिम जिल्ह्यातील श्री. खचकड सुनिल भगवान, हे राज्यातून तसेच मागासवर्गातून प्रथम आले आहेत. तसेच महिला वर्गवारीतून अहमदनगर जिल्हयातील श्रीमती बिडगर सुरेखा रमेश, ह्या राज्यात प्रथम आल्या आहेत.

आयोगाच्या संकेतस्थळावर कट ऑफ मार्क्स प्रसिद्ध करण्यात आले आहेत. या ५८३ उमेदवारांचा गुणवत्ताक्रम आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (एथड) प्रवर्गासाठी राखीव ६५ पदांचा निकाल जाहीर झाल्यानंतर अंतिम करण्यात येईल.अंतिम निकालातील ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची पडताळणी करावयाची आहे अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईलवर पाठविल्याच्या दिनांकापासून १० दिवसांत आयोगाकडे ऑनलाईन पद्धतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक असल्याचे लोकसेवा आयोगाने कळविले आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# जागतिक कौशल्य स्पर्धेसाठी महास्वयंम वेबपोर्टलवर नोंदणी करावी

सोलापूर/प्रतिनिधी : जागतिक कौशल्य स्पर्धा दर दोन वर्षानी होत असते. जगातील सर्वात मोठी व्यवसायिक शिक्षण आणि कौशल्य उत्कृष्ठता स्पर्धा फ्रांस ( ल्योन) येथे होणार आहे. या स्पर्धेत जिल्ह्यातील पात्र युवक युवतींनी मोठ्या प्रमाणात सहभागी होऊन आपल्या कौशल्यांचे सादरीकरण करण्यासाठी महास्वयंम वेबपोर्टलवर नोंदणी करावी, असे आवाहन कौशल्य विकास रोजगार व उद्योजकताचे सहायक आयुक्त सचिन जाधव यांनी केले आहे.जगभरातील २३ वर्षाखालील तरूणांकरिता त्यांच्यातील कौशल्य सादर करण्याची ही स्पर्धा ऑलपिंक खेळासारखीच आहे. यापुर्वी ४६ जागतिक कौशल्य स्पर्धेमध्ये ६२ सेक्टर मधुन ५० देशातील १० हजार उमेदवार समाविष्ट असून, सदर स्पर्धा १५ देशात १२आठवड्यासाठी आयोजित करण्यात आली होती. यापुढील जागतिक कौशल्य स्पर्धा २०२४ मध्ये फ्रांन्स ( ल्योन) येथे होणार आहे. जागतिक कौशल्य स्पर्धा २०२४ करीता वयोमर्यादा हा एकमेव निकष ठरविण्यात आलेला आहे. सदर स्पर्धेत सहभागी होण्यासाठी उमेदवाराचा जन्म दि. १ जानेवारी, २००२ किंवा तद्वंतरचा असावा तसेच, आडेटिव्ह मॅन्युफॅक्चरिंग, क्लाऊड कंप्युटींग, सायबर सिक्युरिटी, डिजिटल कन्स्ट्रकशन, इंडस्ट्रियल डिझाईन टेक्नॉलॉजी, इंडस्ट्री ४.०, इन्फॉरमेशन नेटवर्क केबलिंग, मेकॅट्रॉनिक्स आणि रोबोट इंटिग्रेशन वॉटर टेक्नॉलॉजी या क्षेत्राकीता उमेदवाराचा जन्म दि. १ जानेवारी १९९९ किंवा त्यानंतरचा असणे अनिवार्य आहे. जागतिक कौशल्य स्पर्धा २०२४ साठी जिल्हा, विभाग, राज्य आणि देश पातळीवरून प्रतिभासंपन्न, करण्याच्या दृष्टीने आयोजित स्पर्धेकरिता सर्व शासकीय आणि खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, एमएसएमई टूल रूम्स, सिपेट, आयआयटी, अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्रनिकेतन महाविद्यालये, आयएचएम / हॉस्पिटेलिटी इंस्टिट्यूट, कॉर्पोरेट टेक्निकल इंस्टीट्यूट, स्किल ट्रेनिंग इंस्टीट्यूट, महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, एमएसबीव्हीटी, खाजगी कौशल्य विद्यापीठ, इंस्टीट्यूट ऑफ ज्वेलरी मेकिंग, इतर सर्व प्रशिक्षण संस्था, कला, वाणिज्य, विज्ञान शाखेची कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालये, तसेच, महाराष्ट्र राज्य कौशल्य सोसायटीकडे अधिनस्त सर्व व्यवसायिक कौशल्य प्रशिक्षण संस्था, विविध व्यावसायिक आस्थापना आणि कारखाने यांचेकडील विहीत वयोमर्यादेतील इच्छूक प्रतिभासंपन्न व कुशल उमेदवारांचे नामांकन करता येईल.या स्पर्धेत निवड झालेल्या उमेदवारांना वेळोवेळी लागणारे मार्गदर्शन व सहाय्य महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई यांचेकडून करण्यात येईल. सहभाग घेण्यास इच्छुक असलेल्या पात्र उमेदवारांनी https://kaushalya.mahaswayam.gov.in या लिंकवर भेट देऊन नोंदणी करून आपला सहभाग निश्चित करावा.

तसेच याबाबत काही अडचण असल्यास जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नॉर्थकोट पार्क चौक सोलापुर येथे प्रत्यक्ष भेट द्यावे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्र .०२१७-२९५०९५६ या क्रमांकावर संपर्क साधवा असे आवाहनही कौशल्य विकास रोजगार व उद्योजकताचे सहायक आयुक्त जाधव यांनी केले आहे.


# स्वामी चरित्राबद्दल माहिती मिळाल्याने प्रथमच अक्कलकोटला येवून स्वामींचे दर्शन घेतले



अक्कलकोट/प्रतिनिधी : श्री स्वामी समर्थांची कीर्ती व महती प्रचिती संपूर्ण विश्वासह संपूर्ण देशात आहे. आम्ही संत साहित्याचे गाढे अभ्यासक असल्याने वैदिक हिंदू धर्मातील विविध संत, महात्म्य, सत्पुरुष, देव देवतांबद्दल नेहमीच अभ्यास करीत असतो. यात स्वामी समर्थांची देखील आम्हाला माहिती मिळाली व त्यांच्या जीवन कार्याविषयी त्यांच्या चरित्राविषयी समजून घेता आले. संतांची भूमी महाराष्ट्रात स्वामी समर्थांसारखे अवलिया पुरुष अक्कलकोट निवासी झाले हे महाराष्ट्राचे व समस्त अक्कलकोटकरांचे खूप मोठे भाग्य आहे. स्वामी चरित्र माध्यमातून माहिती मिळाल्याने येथे अक्कलकोट पर्यंत त्यांच्या दर्शनाकरिता आलो असल्याचे मनोगत राजस्थानच्या जयपूर अमरापूर येथील स्वामी देऊन रामजी महाराज संस्थांचे तसेच संत साहित्य क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय ख्यातीचे थोर संत जितेंद्र प्रेम प्रकाशी,संत लक्ष्मण प्रेम प्रकाशी, संत परसराम प्रेम प्रकाशी यांनी व्यक्त केले ते नुकतेच प्रथमच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. याप्रसंगी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांनी संत मंडळींचा स्वामींचे कृपावस्त्र देऊन यथोचित सन्मान केला. याप्रसंगी संत जितेंद्र प्रेम प्रकाशी बोलत होते. यावेळी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीकांत मलवे, गिरीश पवार, संजय पवार इत्यादी उपस्थित होते.

# संत ज्ञानेश्वर सार्वजनिक वाचनालय हन्नूर येथे वाचन दिन साजरा

अक्कलकोट/प्रतिनिधी : संत ज्ञानेश्वर सार्वजनिक वाचनालय हन्नूर येथे वाचन दिन व वाचन महिना साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष अनंत चैतन्य प्रशाला हन्नूर येथील माध्यमिक शाळेतील शिक्षक श्री जाधव सर उपस्थित होते. सर्वप्रथम डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन ग्रा.प.सदस्य पत्रकार गौतम बाळशंकर व सौ माळी मॅडम यांच्या हस्ते करण्यात आले. पुस्तकाचे पूजन श्री जोजन सर यांनी केले. यावेळी माध्यमिक शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते व तसेच बालवाचक उपस्थित होते. तसेच बालवाचकांचे चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आले होते. यावेळी ग्रामपंचायत सदस्य ,पत्रकार श्री गौतम बाळशंकर यांनी मनोगत व्यक्त करतांना म्हणाले की, वाचन संस्कृती वाढत जाण्यासाठी,ग्रंथालय हा समृद्ध मार्ग निर्माण झाला आहे.ग्रंथालयात वेळ घालवणारे विद्यार्थी नक्कीच यशस्वी होतात,ग्रंथालय हे ज्ञानाची ऊर्जा स्त्रोत असून.वाचन संस्कृती जोपासण्याचं सगळ्यात मोठं कारखाना आहे असे मी समजतो. यावेळी गावातील नागरिक, वाचनालयाचे सभासद, ग्रंथपाल सौ सोनाली शिंदे व लिपिक, शिपाई व तसेच गावातील ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते. वाचनालयाच्या ट्विटरवर व तसेच राजा राम मोहन राय कोलकत्ता त्यांच्या ट्विटरवर सेंड केलेले आहे.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार अनंत चैतन्य प्रशालेचे ग्रंथपाल काशिनाथ हाताळे सर यांनी केले.




# संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाकडील विविध योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन

सोलापूर/प्रतिनिधीः संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळामार्फत चर्मकार समाजासाठी विविध कर्ज योजना राबविल्या जातात. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरिता राज्य शासनाच्या व केंद्र शासनाच्या (एन.एस.एफ.डी.सी.) योजना राबविण्यात येत असून,या योजनांचा चर्मकार समाजाने लाभ घ्यावा असे आवाहन संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक धम्मज्योती गजभिये यांनी केले आहे.

महामंडळामार्फत सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरिता राज्य शासनाच्या व केंद्र शासनाच्या (एन.एस.एफ.डी.सी.) योजनेसाठी ४ हजार ८०० लाभार्थ्यांना कर्ज वाटपाचे उद्दिष्ट देण्यात आले आहे.एन.एस.एफ.डी.सी.नवी दिल्लीच्या मुदती कर्ज योजनेतंर्गत लहान उद्योग १ लाख, १ लाख ५० हजार व २ लाख रुपये, चर्मोद्योग २ लाख रुपये, लघुत्रऋण वित्त योजना व महिला समृध्दी योजना प्रत्येकी ५० हजार रुपये योजनांसाठी मागील प्रलंबित नस्तींकरिता २२.२१ कोटी इतका निधी प्राप्त झालेला आहे.

तसेच सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात एन. एस.एफ.डी.सी. यांच्या मुदती कर्ज योजनेतर्गंत लहान उद्योग ५ लाख रुपये, लघु ऋण वित्त योजना व महिला समृध्दी योजना प्रत्येकी रूपये १ लाख ४० हजार रुपये तसेच नवीन महिला अधिकारीता योजना ५ लाख मंजूर झालेले आहेत. एन. एस.एफ.डी.सी. यांच्या शैक्षणिक कर्ज योजनेमध्ये वाढ झाली असून भारतामध्ये २० लाख रुपये व विदेशामध्ये ३० लाखांपर्यंत कर्ज मंजूर करण्यात येईल.अधिक माहितीसाठी नजीकच्या महामंडळाच्या जिल्हा कार्यालयास भेट द्यावी, असे आवाहनही संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक श्री गजभिये यांनी केले आहे.

# पंढरपूर तालुक्यातील कोतवालपदाच्या रिक्त जागांसाठी उद्या आरक्षण सोडत

पंढरपूर/प्रतिनिधी : सोलापूर जिल्ह्यातील कोतवाल संवर्गातील रिक्त असलेल्या पदांच्या ८० टक्के मर्यादेत पदे भरण्याबाबतचा कार्यक्रम घोषित झाला आहे. त्यानुसार सध्या पंढरपूर तालुक्यामध्ये एकुण ११ सजातील पदे रिक्त आहेत. या कोतवाल भरतीची आरक्षण सोडत प्रांताधिकारी तथा निवड समितीचे अध्यक्ष गजानन गुरव यांच्या उपस्थित तहसिल कार्यालय पंढरपूर येथे गुरुवार दिनांक २० जुलै २०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता काढण्यात येणार असल्याचे तहसिलदार सुशिल बेल्हेकर यांनी सांगितले.

पंढरपूर तालुक्यामध्ये एकूण ५३ सजे मंजूर असून एका सजास एक कोतवाल प्रमाणे ४२ कोतवाल कार्यरत आहेत. तर पंढरपूर तालुक्यातील ११ सजांमधील कोतवाल पदे रिक्त आहेत. यामध्ये गोपाळपूर, अनवली, गुरसाळे, गादेगाव,गार्डी, बोहाळी,कौठाळी, ईश्वरवठार, पटवर्धन कुरोली, सांगवी, आणि पटवर्धन कूरोली सजांचा समावेश आहे. रिक्त ११ कोतवाल पदांपैकी शासन आदेशान्यवे ८० टक्के पदे भरावयाची असल्याने पंढरपूर तालुक्यात ११ रिक्त पदांपैकी ९ सजाचे ठिकाणी कोतवाल पदाच्या जागा भरण्यात येणार आहेत.

संबधित सजाचे आरक्षण सोडतीसाठी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, लोकप्रतिनिधी, मान्यवर पदाधिकारी तसेच संबधित गावच्या ग्रामस्थानी उपस्थित रहावे आवाहन तहसिलदार तथा कोतवाल निवड समितीचे सचिव सुशिल बेल्हेकर यांनी केले आहे.

# प्रभारी तहसीलदार राजशेखर लिंबारे यांच्या उपस्थितीत संजय गांधी निराधार योजनेची बैठक संपन्न



सोलापूर/प्रतिनिधीः दक्षिण सोलापूर तालुक्याचे प्रभारी तहसीलदार राजशेखर लिंबारे यांच्या अध्यक्षतेखाली संगायो निराधार अनुदान समितीची दुसरी सभा संपन्न झाली. राजशेखर लिंबारे यांना मा. जिल्हाधिकारी सोलापूर यांनी प्रभारी तहसिलदार दक्षिण सोलापूर म्हणून अति. कार्यभार सांभाळण्यासाठी दिलेले आहे. दिनांक १५ जुलै रोजी संजय गांधी निराधार अनुदान समितीची सभा आयोजित करुन सदर सभेमध्ये एकुण २२८ प्रकरणे मंजूर केलेली आहेत.

त्यानंतर दिनांक १७ जुलै रोजी संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना सदर संगायो या शाखेतील सर्व प्रकरणे तपासणी करुन दुस-या सभेसाठी सुचना देवून तसेच दिनांक १७ जुलै रोजी संजय गांधी निराधार योजनेचे ८४ लाभार्थी,

श्रावणबाळ राज्य सेवा निवृत्तीवेतन योजनेचे ८१, राष्ट्रीय विधवा योजनेचे ३८, इंगायो राष्ट्रीय अपंग २, राष्ट्रीय वृध्दापकाळ योजनेचे ४७ असे एकुण २५२ पात्र लाभार्थ्यांचे प्रकरणे मंजूर करण्यात आलेली आहेत.सदर २ महिन्यात संगायो निराधार अनुदान समितीच्या बैठकीत एकुण ४८० प्रकरणे मंजूर करुन लाभार्थ्यांना दिलासा देण्याचे कामकाज करण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे कुटुंब अर्थसहाय्य योजनेचे एकुण १४ प्रकरणे देखील मंजूर करण्यात आलेले आहेत.

सदर संजय गांधी योजना बैठकीस संगायो नायब तहसिलदार श्रीमती आरती दाबडे, अव्वलकारकुन श्रीमती परवीन रंगरेज, महसूल सहाय्यक श्रीमती कुलकर्णी एस.एल. व श्री. सोनवणे सुधीर हे उपस्थित होते.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील जनतेनी सदरकामी कोणत्याही एजंटशी अथवा मध्यस्थाशी संपर्क न करता थेट संगायो शाखा दक्षिण सोलापूर येथे बँकेचे पासबुक, आधारकार्ड, व पासपोर्ट साईजचे फोटो आणून नोंदणी करण्यात यावे. असे आवाहन संगायो नायब तहसिलदार श्रीमती आरती दाबडे यांनी केले आहे. **-प्र. तहसिलदार दक्षिण सोलापूर**

# प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारांसाठी ३१ ऑगस्टपर्यंत प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन


सोलापूर/प्रतिनिधी : केंद्रीय महिला व बाल विकास मंत्रालयाच्या वतीने प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार दरवर्षी प्रदान केला जातो. यासाठी अर्ज पाठवण्याची अंतिम तारीख ही ३१ ऑगस्ट २०२३ करण्यात आली आहे. प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार २०२४ करीता अर्ज सादर करण्याच्या प्रक्रीयेची संपुर्ण माहिती https://awards.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याची माहिती जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी डॉ. विजय खोमणे यांनी दिलीआहे.असामान्य धाडस, क्रीडा, समाजसेवा, विज्ञान आणि तंत्रज्ञान पर्यावरण कला आणि संस्कृती तसेच नवोन्मेष या क्षेत्रातील अतुलनीय कार्याला राष्ट्रीय पातळीवर नावलौकीक मिळवून देण्याच्या उद्देशाने या पुरस्कारांची सुरवात करण्यात आली आहे. भारताचे नागरीकत्व आणि रहिवाशी असेलेली मुले मुली ज्यांचे वय १८ वर्षापेक्षा कमी आहे. असे या पुरस्कारासाठी अर्ज करु शकतात. अथवा कोणीही भारतीय नागरीक देखील पुरस्कारासाठी पात्र असणाऱ्या मुलांमुलीचे नामांकन करु शकतात. या पुरस्कारांसाठीचे अर्ज विहीत केलेल्या https://awards.gov.in या संकेतस्थळाच्या माध्यमातुनच स्विकारण्यात येणार आहेत. असेही जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी डॉ. खोमणे यांनी पत्रकान्वये कळविले आहे.




# महालक्ष्मी ग्रंथालयात चित्रकलास्पर्धेचे आयोजन

सोलापूर/प्रतिनिधी : मानवी जीवन आनंदमयी बनवायचे असेल तर जीवनात रंगसंगती जुळविणे गरजेचे असते. चित्रकला व रांगोळी स्पर्धेतून विद्यार्थ्यांना ती रंगसंगती जुळविणे सहजपणे शक्य होते. अक्षरे जुळवून वाचन करण्याचे कौशल्य जसे असते तसेच कौशल्य चित्रकलेने विद्यार्थ्यांना प्राप्त होते. असे मत प्रा.डॉ. भीमाशंकर बिराजदार यांनी श्री महालक्ष्मी ग्रंथालय आयोजित ग्रंथ तद्न्य पी.एन.पणिकर यांच्या स्मृती प्रित्यर्थ संस्कृती मंत्रालय, भारत सरकार व जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय सोलापूर यांच्या नेतृत्वाखाली आयोजित चित्रकला स्पर्धेच्या बक्षीस समारंभात मांडलेकार्यक्रमाच्या प्रारंभी ग्रंथपाल अश्विनकुमार जम्मा यांनी ग्रंथालयाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाची माहिती दिली. विद्यार्थी व वाचकांनी अशा प्रकारच्या उपक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन केलेनिलमनगर परिसरातील विद्यार्थी या स्पर्धेत सहभाग नोंदवला होता. यशस्वी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देऊन गौरविण्यात आले.कार्यक्रमास परिसरातील विद्यार्थी , पालक व वाचक उपस्थित होते.

## शब्दकोडे क्र ६४



आडवे शब्द १.महाराष्ट्र राज्य मार्ग ----- महामंडळ म्हणजे एस.टी. ५.स्वादीष्ट,रूचकर ७.भांडकुदळ,भांडणारा ८.भारी,वजन असलेला ११.पलंग,शेज १२.वधु सोबत असलेली बहीण किंवा मुलगी १३.अजय देवगण-तब्बु यांचा एक चित्रपट,कथा,गोष्ट हिंदीत १४.बगल १६.रोकड देऊन,रोख १७.स्वयंपाकघरातील एक काचेचे किंवा चिनी मातीचे भांडे १८.सप्तपातळापैकी एक २१.कवाली गाणारा २२.रोगउपचार २३.फुलांचा हार,स्त्रीया वेणीत खोचतात तो २४.विदयुत,विज २६.अमसुल किंवा त्याचे झाड २७.डोळयात घालावयाचे काजळ हिंदीत २८.लहान कोयता २९.वाट,पथ ३०.डोंगराची तुटलेली कपार ३१.जहाल विरूद्ध ३३.हिंदीत कांदा ३४.विपुल,भरपुर ३६.पती,धनी ३७.गळ,आकडा ३८.दरवाजा,द्वार ३९.सैन्य,दल ४१.मोठेपणा,महानता ४३.कामना,इच्छा ४५.उसाच्या रसाची दुकान ४७.गाण्याचा सराव ४९.बशीचा जोडीदार ५०.थोडेसे करपलेले ५३.प्रत्येक,भाव ५४.ऐसपैस मांडी मारून बसने ५६.एक गोड व आंबट फळ ५८.एकटा,सांमर्जन ५९.नसती कुरापत ६३.मीन,मत्स्य ६४.इजिप्त मधील प्रसिद्ध नदी ६६.भरभराट,सुबत्ता ६८.टपालाने त्वरीत संदेश पाठवण्याची एक पद्धत ६९.रंगाने काळा नसलेला ७१.घसारा,झीज ७२.शत्रु मागे लागला म्हणजे पळणारांना जमीन पुरत नाही या अर्थी एक म्हण ७३.आकाशात उंच उडणारा पक्षी

उभे शब्द १.रस्त्यावरील कर,जकात २.वरकरणी,बाहेरून ३.नविन,नवा,नुतन ४.हिंदीत प्राण,जीव ६.राम तेरी गंगा मैली चित्रपटाची नायिका ७.कारस्थान,कावा ९.एक भारतीय क्रिकेटपटु'---- श्रीनाथ' १०.मोठया भावाला हाक मारावयाचा एक शब्द ११.विश्वास,भरवसा १३.मृग,काळवीटाच्या जातीचा एक प्राणी १४.सापाने टाकलेली त्वचा १५.'उथळ पाण्याला ----- फार'एक म्हण १६.पलंग विणण्याची कापडी पट्टी १७.सुक्या मेव्यातील एक फळ १९.शेतीलवरील कर,समस्त २०.पत्यातील एक खेळ २२.गरज,आवश्यकता २३.विष,जहर २४.बायको,भार्या २५.कमळ,राजीव २६.शुष्कता,कोरडेपणा २७.चांगला वास,सुगंध ३०.धोंडा,पत्थर,खडा ३२.पलीकडील तिराला,त्या किनाऱ्याला ३३.तहान हिंदीत ३४.निघालेला,मार्गस्थ ३५.भात शिजताना होणारा आवाज ३६.महीना,मास ३७.घटस्फोट,काडीमोड३८.व्यायाम,जोर ४०.सोन्याची परीक्षा,अर्क ४१.बुद्धी ४२.वादयांचा मोठा आवाज ४४.शुर,योद्धा ४६.नमन,नमस्कार ४८.श्रीकृष्णाचे कुळ ५०.झोक,हिंदीत उदया ५१.प्रभात,सकाळ ५२.यातना,तसदी,कष्ट ५४.झाडू,केरसूणी५५.मिळकत,आय ५६.शर्त,पैज ५७.अलंकार शास्त्रात वर्णीलेले नऊ रस ५८.एक पांढरा भित्रा प्राणी ६०.अर्ध्या ओंजळीचे माप ६१.पडणे,नाश ६२.आठवडयातील रविवारनंतरचा वार ६३.आईची बहीण ६४.श्रीफळ ६५.भूगोल उलटे करा ६६.पाहणे ६७.करडया रंगाचा ६८.ज्वर ७०.एकदम छोटी वस्तू, '-- चा पर्वत करणे' एक म्हण

